# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक – ५२७/२०२२/धुळे**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जितेंद्र भगवान वाल्हे<br>रा. ३९, अ गुरु गणेश नगर,<br>मोराणे (प्र.ल.), ता.जि. धुळे. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, नगांव,<br>ता.जि. धुळे. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>सहाय्यक गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, धुळे, ता.जि. धुळे. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक – १२/०१/२०२३**

अपिलार्थी यांनी दि. ०८/०१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी एकाच विषयाची व ते स्वता अमलबजावणी करीत असलेले योजनेची मागणी केलेली असताना एका विषयाला अनेक विषयाचा रंग देऊन माहिती पासून वंचित ठेवले आहे, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.१२/०१/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** सर्व पक्षकार उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि. २९/०७/२०२१ रोजीचा माहिती अर्ज दिनांक ३०/०७/२०२१ रोजी ग्रामपंचायतस प्राप्त झाला आहे. सदर माहिती अर्जान्वये १. ग्रामपंचायतीने २०१७ ते २०२१ या दरम्यान कोन कोनते विकास कामे केली त्या विकास कामांची यादि मिळावी या विकास कामासाठी केंद्र सरकार राज्य सरकारच्या कोणत्या योजनेतुन किती निधी मिळाला सदर निधी कधी व कसा खर्च करण्यात आला, २.आपल्या ग्रामपंचायतीच्या मागील ३ वर्षाचा ऑडीट रिपोर्टची छायांकित प्रत मिळावी, ३. ग्रामपंचायतीला सन २०१९ ते सन २०२१ या तिन वर्षात प्रती वर्षी कोण कोणत्या उद्देशासाठी शासना कडुन किती रुपये थेट अनुदान किंवा मदत रक्कम मिळाली या रकमेचा विनियोग कोठे केव्हा व कसा झाला, ४. सन २०१७ ते सन २०२१ आजतागायत तारखेपर्यंत आदिवासी व बिगर आदिवासी योजनेचा प्राप्त निधी, खर्च व शिल्लक निधी यांची छायांकित प्रती याबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक १३/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्र. १ बाबत आपण मागणी केलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात आहे. आपणास माहिती नेमकी कोणत्या योजनेची आवश्यकता आहे यांचा बोध होत नाही. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ शासन अधिसुचना जानेवारी २०१२ अन्वये कोणत्याही एकाच विषयाची

माहिती मागणी बाबत सुधारणा केली आहे. त्या अनुषंगाने आपणास मुद्दा क्र. २ बाबत ग्रामपंचायतीच्या मागील ३ वर्षाचे ऑडीट रिपोटची माहिती केली असुन सदर माहिती ग्रामपंचायतीने संकलीत केली आहे. माहिती छायांकित करणेसाठी एकूण प्रती १३५X२ एकुण २७०/- खर्च अपेक्षीत असुन सदर रक्कम लेखाशिर्षावर भरणा करुन चलन ग्रामपंचायतीस सादर करावे त्यानंतर मुद्दा क्र. २ बाबत माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येईल, असे कळविले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दि. ०२/०९/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दि.०४/१०/२०२१ रोजी, निर्णय पारित करुन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत नगांव यांनी अपिलार्थी यांना पुनश्च माहिती अवलोकनासाठी उपस्थित राहणे बाबत पत्र देऊन अपिलार्थीना हवी असलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यांची कार्यवाही करावी असे निर्देश देवुन प्रथम अपिल निकाली काढले.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी ४ मुद्यांद्वारे माहिती मागणी केलेली होती विहीत मुदतीत त्यांना मुद्दा क्र. २ बाबत माहिती शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले असुन इतर मुद्यांसाठी स्वतंत्र अर्ज करण्याबाबत सुचीत केले होते. मात्र अपिलार्थी यांनी माहिती शुल्क न भरल्याने माहिती पुरविता आली नाही. तसेच प्रथम अपिल आदेशानंतरही दुरध्वनी द्वारे सुचीत करुन माहितीचे अवलोकन करण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत सुचीत केले होते. मात्र अपिलार्थी माहितीचे अवलोकन करण्यासाठी उपस्थित न राहील्याने माहिती पुरविता आली नाही. अपिलार्थी यांनी सांगितले की, माहिती शुल्क भरण्याबाबत ग्रामपंचायत कार्यालयात गेले असता ग्रामपंचायत कार्यालय बंद असल्याने माहिती शुल्क भरता आले नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अवलोकनाबाबत कोणतेही पत्र व्यवहार केला नसुन दुरध्वनीद्वारे देखील सुचीत केले नसल्याने माहिती अवलोकनासाठी उपस्थित राहाता आले नाही.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २९/०७/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत मुद्दा क्र. २ बाबत माहिती शुल्क भरण्याबाबत व इतर मुद्यांची माहिती बाबत स्वतंत्र अर्ज करण्याबाबत सुचीत केले असल्याचे दिसुन येते. मात्र अपिलार्थी यांनी सांगितले की, माहिती शुल्क भरण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी कार्यालयात गेले असता कार्यालय बंद असल्याने माहिती शुल्क भरले नसल्याचे दिसुन येते. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिल आदेशानंतर केलेल्या कार्यवाही बाबत कोणतेही अभिलेख आयोगास सादर केले नाही. तथापि, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्देशानुसार अपिलार्थीस अवलोकनासाठी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

या प्रकरणी अपिलार्थी यांना अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही. प्रस्तुत प्रकरणी एकूण परिस्थितीचा विचार करता अधिनियमातील कलम १९(८) (क) मध्ये नमूद केल्या प्रमाणे राज्य माहिती आयोगास निर्णय प्रक्रियेत अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन करण्यासाठी आवश्यक असतील अशी उपाययोजना करण्यात सार्वजनिक प्राधिकरणाला फर्माविण्याचा अधिकार आहे. त्यानुसार कलम १९ (८) (क) (२) नुसार जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याच्या तरतुदींस अधीन राहुन या प्रकरणी सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, धुळे यांना जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सबब,आता या प्रकरणी सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, धुळे यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने संबंधित कार्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घेऊन पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (८) (क) (२) नुसार सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, धुळे यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, धुळे यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २९/०७/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेली माहिती संबंधित प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस व्यक्तीशः विनामूल्य पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नगांव श्री. संजय पुंडलिक पाटील यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

३) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ५२७/२०२२/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, धुळे, ता.जि. धुळे.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री. संजय पुंडलिक पाटील (तत्कालीन जन माहिती अधिकारी) तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नगांव, ता. जि. धुळे.

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./५२७/२०२२/धुळे ओ-** 624 **दिनांक-** 03/08/2023